नवीनचंद्र मफतलाल

विरुद्ध

द कमिशनर ऑफ इनकम टॅक्स, बॉम्बे सिटी

[मेहेरचंद महाजन सी. जे.]

एस. आर. दास गुलाम हसन , भगवती आणि वेंकटरमा अय्यर न्यायमूर्तीगण

भारतीय प्राप्तिकर कायदा (१९२२ चा ११वा) -कलम १२-ब ,भारत सरकार कायदा, १९३५(२६भू. ५प्र. २) अनुसूची- ७, यादी -१,आइटम ५४-भांडवली नफ्या वरील कर याची अवैधता -भांडवली नफा उत्पन्न होते काय - वैधानिक वापर -- शब्दांचा अर्थ लावणे -राज्यघटनेत वापरलेले शब्द

भारतीय प्राप्तिकर कायदा १९२२ चे कलम १२-ब (१९४७ च्या च्या कायद्या ने अंतर्भूत केलेले), ज्याने "भांडवली नफ्यावर" कर लागु केला होता , तो भारत सरकार कायदा १९३५ अन्वये अवैध नाही. "भांडवली नफा" या शब्दांचा अर्थ "उत्पन्न " या शब्दाच्या अर्थसारखा, जो भारत सरकार कायदा , १९३५ चे परिशिष्ट -७, यादी -१,आयटम-५४ मध्ये नमूद आहे.

"उत्पन्न " या शब्दाचा अर्थ "भांडवली नफा " यात येतं नाही असे म्हणणे चुकीचे होईल, तसेच "उत्पन्न " व "भांडवल" यामध्ये विधिमंडळाच्या प्रथेने एक सीमित

रेखा काढलेली आहे असेही निर्णीत करणे हा चुकीचा दृष्टिकोन होईल . याठिकाणी ज्याचा घेतलेला आहे कि विधिमंडळाची जी प्रथा आहे ती ती दुसरे तिसरे काहीही नसून न्यायालयीन विश्लेषणाने प्राप्तिकर व आर्थिक कायद्यांमध्ये वापरलेला शब्द   "उत्पन्न " याची केलेली व्याख्या आहे. सदर व्याख्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ च्या ७ व्य परिशिष्ट मधील यादी -१ मधील आयटम नो. ५४ मध्ये वापरलेल्या "उत्पन्न " या शब्दाचा सामान्य नैसर्गिक अर्थ कमी करत नाही.

शब्दांचे अर्थ लावण्याचा मुख्य नियम असा आहे कि "शब्द" हे त्यांच्या त्यांच्या सामान्य नैसर्गिक आणि व्याकरणात्मक अर्थाने वाचले पाहिजेत. परंतु विधिमंडळास अधिकार प्रदान करत असलेल्या घटनात्मक कायद्यामधील शब्दांचे अर्थ मात्र उदारमतवादी आणि त्यांच्या व्यापक अर्थाने लावले पाहिजेत.

<u>संदर्भ देणेत आलेले न्यायनिर्णय खालील प्रमाणे होते</u>:

1. कमिशनर ऑफ इनकम टॅक्स विरुद्ध शॉ वॉलेस अँड कंपनी [एल. आर ५९ आय. ए. २०६];

2. रयाल विरुद्ध हूर आणि   न्याल विरुद्ध हनिवील [१९२३]८ टी . सि . ५२१;एड कॅलिफोर्निया कॉपर सिंडिकेट [Limiated and Reduced] विरुद्ध Ha"is [१९०४]५ टी. सी. १५९;

3. व्यालेस ब्रदर्स अँड कंपनी लिमिटेड विरुद्ध कमिश्नर ऑफ इनकम टॅक्स ,[एल . आर . ७५ आय. ए . ८६] :[१९४८]एफ. सि . आर. १ : १६ आय . टी . आर. २४०; क्रॉफ्ट विरुद्ध डन फी एल . आर. १९३३ ए . सि . १५६;

4.कामाक्षा नारायण सिंग विरुद्ध कमिश्नर ऑफ इनकम टॅक्स [एल . आर. ७० आय. ए . ८० ; [१९४३]११ आय. टी. आर. ५१३; in ref द सेंट्रल प्रोव्हिन्सस बेरार ऍक्ट नं . १९३८ चा १४[१९३९]एफ. सी. आर. १८;

5. युनायटेड प्रोव्हिन्सस विरुद्ध अतिका बेगम [१९४०]एफ.सी.आर. ११०;

6. स्टेट ऑफ बॉम्बे व इतर विरुद्ध बलसारा[१९५१]एस.सी.आर. ६८२;

7. इजनर विरुद्ध म्यकोम्बर [२५२]यु.एस. १८९: ६४एल. Ed ५२१;

8. मर्चंटस लोन अँड ट्रस्ट कंपनी विरुद्ध [२'./५यु.एस. ५०९: ६५.L .Ed . ७५१;

9. युनाइटेड स्टेट्स विरुद्ध स्टिवर्ट [३११ यु.एस. ६०: ८५ L . Ed . ४०] आणि,

रिसच विरुद्ध फेडरल कमिश्नर ऑफ टॅक्सशन [६६सी.एल.आर. १९८, refered to

<u>दिवाणी अपिलीय न्यायाधिकारीता</u> :

मुंबई उच्च न्यायालयाचा प्राप्तिकर संदर्भ अर्ज नं. ४६/१९५० मध्ये दिनांक ७ सप्टेंबर १९५१ रोजी दिलेला निकाल व आदेश या विरुद्धचे दिवाणी अपील नं. १९४ /१९५२.

वकील :

अपिला कर्त्या साठी : एस.मित्रा.[समवेत आर. एफ. कोलाह व आय.एन.श्रॉफ]

सामनेवाले साठी: भारत सरकारचे महाअधिवक्ता एम.सी. सेटलवाड [समवेत जी . एन. जोशी]

दिनांक १ नोव्हेंबर १९५४ रोजी न्यायालयाचा हा न्यायनिर्णय न्यायमूर्ती दास यांनी जाहीर केला आहे .

न्यायमूर्ती दास : अपीलकर्ता याने प्राप्तिकर कायदा १९२२ चे कलम ६४(१) खाली स्वतः दाखल केलेला संदर्भ अर्ज दिनांक ७ सप्टेंबर १९५१ मध्ये मुंबई उच्च न्यायालय यांनी दिनांक ७ डिसेंबर १९५१ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द केलेले आहे. दिनांक ३१मार्च १९४८ रोजी प्राप्तिकर अधिकारी ,मुंबई यांनी अपिलकर्ता याचे प्राप्तिकर आकारणी वर्ष १९४७-१९४८ ची प्राप्तिकरा ची आकारणी रु. १९,६६,७८२/- मध्ये अपील कर्त्या च्या हातात कलम १२-ब खाली असलेली भांडवली नफ्याची रक्कम रु. ९,३८,०११/- समाविष्ठ करुन आदेश केला होता. सदरचा भांडवली नफा हा अपीलकर्त्यास खाली परिस्थिती मध्ये झाला होता. त्याला मुंबई येथे असलेल्या काही स्थावर मिळकती मधे त्याचा अर्धा हिस्सा त्याने व त्याने हिस्सेदार होता तो त्यांनी ३१डिसेंबर १९४६ रोजी संपणारे आर्थिक वर्ष मधे मफतलाल गगलभाई आणि कंपनी नावाच्या प्राइवेट लिमिटेड कंपनी ला विक्री केला होता. सदर विक्री केलेल्या

मिळकती मधून झालेला एकूण रु. १८,७६,०२३/- चा नफा झाला होता आणि त्यापैकी अपीलकर्त्या च्या निम्मा हिश्या ची रक्कम रु. ९,३८,0 ११/-आकारणी मध्ये घेतली गेली होती.

सदर अपीलकर्ता याने अपिलीय सहाय्यक आयुक्त यांचेकडे अपील दाखल करून त्या मध्ये असे कथन केले होते कि सदर कायद्याचे कलम १२-ब खाली भांडवली नफ्याची करणेस दिलेले अधिकार हे केंद्रीय विधिमंडळ नुसार अवैध आहेत . सदर अपिलीय सहाय्यक अधिकारी यांनी त्यांचा दिनांक ५ एप्रिल १९४९ रोजी करून सदर अपील नामंजूर केले होते. त्यावर केलेले पुढील अपील प्राप्तिकर अपिलीय ट्रिब्युनल यांनी त्यांचा आदेश दिनांक ३० जुन १९५० करून नामंजूर केले .

वर नमूद आदेशावर नाखूष झालेमुळे याने त्यांचेकडे कलम ६६-[१] खाली काही कायदेशीर मुद्धे उपस्थित करत अर्ज केला होता. सदर अपिलीय ट्रॅब्युनल यांनी त्यांचे त्यांचे आदेशावर काही कायदेशीर मुद्धे निर्माण होत आहेत असे सहमत झालेमुळे एक स्टेटमेंट तयार केले होते उभय पक्षकार याना मान्य होते व सदर स्टेटमेंट उच्च न्यायालयाकडे संदर्भासाठी पाठवले होते:-

१] केंद्रीय विधिमंडळाने सदर भांडवी नफ्यावर कर आकारणी करणे बाबतची तरतूद अवैध आहे का ?

२] सदर कर बसवणे ची तरतूद हि भारतीय प्राप्तिकर कायद्यामध्ये दुरुस्ती करून केलेली असलेमुळे ती बेकायदेशीर होतेआहे काय?

उच्च न्यायालयाने रेफेरेंस प्रकरणामध्ये मध्ये युक्तिवाद ऐकून व इनकम टॅक्स रेफेरेंस क्रमांक १८/१९५० मधील सर दिगगन आणि लेडी जिना जे दिगगन विरुद्ध कमिशनर ऑफ इनकम टॅक्स,

बॉम्बे सिटी, यामधील न्यायनिर्णयाचे पालन करत मुद्धा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देऊन , मुद्धा क्रमांक २ चे उत्तर देणेही गरज नाही असे मत व्यक्त केले होते . सदर रेफेरेंस प्रकरणात दोन्ही सन्माननीय न्यायाधीशांनी मुद्धा क्रमांक १ चे उत्तर समान दिले, परंतु दोघांनी आप-आपल्या स्वतंत्र निकालपत्रामधे त्यांची कारणे वेगवेगळी नमूद केली होती .

उच्च न्यायालयापुढे तसेच आमच्यापुढे याचे चर्चित झाले कि कलम १२-ब हि तरतूद जी भांडवली नफ्यावर कर बसविनेस अधिकार देते, ती तरतूद हि केंद्रीय विधिमंडळ यांचे अधिकारबाह्य असलेमुळे अवैध आहे काय. इंडियन इनकम टॅक्स अँड एकसेस प्रोफिट्ट टॅक्स [दुरुस्ती]ऍक्ट, १९४७[२२ चा १९४७], जो केंद्रीय कायदा आहे त्याअन्वये कलम १२-ब हे अंतर्भूत करणेत आले होते. गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट चे कलम १०० मधील तरतूद केंद्रीय विधिमंडळाला सदर कायद्याच्या सातव्या अनुसूचीच्या पहिल्या यादीतील एन्ट्री क्रमांक ५४ व ५५ मध्ये नमूद विषयाबाबत कायदे करण्याचे अधिकार प्राप्त आहेत.. सदर पहिल्या यादीतील एन्ट्री क्रमांक ५४ व ५५ नमूद नोंदी फक्त सदर आक्षेपित कायद्याच्या कायदेशीर अस्तित्वाबाबत विचारात घेणे उचित आहे, ज्या खाली नमूद केलेप्रमाणे होत्या;

"५४. शेतीमधील उत्पन्न सोडून इतर उत्पन्न "

"५५. वैयक्तिक व कंपनीच्या मिळकती शेतीजमिनी वगळून चे भांडवली मूल्यावरील कर व कम्पनीच्या भांडवल वरील कर,"

प्रमुख न्यायमूर्ती छगला यांनी असे निर्णीत केलेले आहे कि १९४७ चा २२ हा कायदा ज्याने कलम १२-ब अंतर्भूत केला तो कायदा केंद्रीय विधिमंडळा च्या अधिकाराच्या कार्यकक्षेत बसतो कारण तो कायदा हा एन्ट्री क्र. ५५ मध्ये नमूद हवं आणि तो वैध असून तो सम्पुर्णतः किंवा तो कोणत्याही परिस्थितीत व्यक्ती किंवा कंपनी यांना लागू केलेला आहे . मुख्य न्यायमूर्ती याना जरी सदरचा कायदा हा कायदेमंडळाचा एक कायदेशीर दस्त असताना तो एन्ट्री क्रमांक ५५ च्या व्याप्ती मध्ये आहे काय हे निर्णीत करणेची जरुरी नव्हती परंतु त्यांनी तो केलेल्या युक्तिवाद वरून असे मत दिले कि तो त्यामध्ये बसत नाही. याउलट न्यायमूर्ती तेंडुलकर यांनी असे निर्णीत केले कि १९४७ चा २२ व कायदा हा पूर्णतः केंद्रीय कायदेमंडळ च्या अवैध आहे कारण तो तो एन्ट्री क्रमांक ५४ मध्ये येतो व त्यामुळे त्यांना याचे विवेचन करणे गरजेचे वाटले नाही कि तो तो कायदा अनुसूची ७ यादी कर्मांत १ मधील एन्ट्री क्रमांक ५५ च्या व्याप्ती मध्ये बसतो किंवा नाही. आमच्या मते न्यायमूर्ती तेंडुलकर यांनी काढलेले अनुमान बरोबर व आधार असलेले आहे .

श्री कोलाह यांनी त्यांच्या कौशल्यपूर्ण व कार्यक्षम पाने केलेल्या युक्तिवादात असे स्पष्टपणे सांगितले कि एन्ट्री क्रमांक ५४ जी "उत्पन्नावरील कर" याच्या बद्धल आहे , तिच्या व्याप्ती मध्ये "भांडवली नफा वरील कर" येत नाही . त्यांच्या मते नैसर्गिक अर्थ, सामान्य वापर, अगर इंग्लंड व भारतीय न्यायिक प्रणाली यांनी संबंधित कायद्यांचे विश्लेषण केलेलया विवेचनावरून "उत्पन्न " या व्याख्ये मधे "भांडवली नफा" सूचित करत नाही . युक्तिवादात त्यांनी अशी सांगितले कि उत्पन्न व भांडवली नफा यामध्ये एक स्वच्छ फरक असून जो इंग्लिश वकील व इंग्लिश कायदेतद्न्य यांनी नमूद केला आहे जो इंग्लिश कायदेमंडळ यांनी सदर फरक मान्य केलेला असून तो फरक इंग्लंमधील

कायदेमंडळाच्या प्रथेनुसार ब्रिटिश सरकारने सदर एन्ट्री क्रमांक ५४ मधील नोंदीचा अर्थ समजावून घेऊन व लावून नंतर भारत सरकार कायदा १९३५ चा कायदा केला होता असे विद्यमान मुख्य न्यायमूर्ती यांचे मत हे पूर्णतः बरोबर आहे. फायनान्स ऍक्ट , इनकम टॅक्स ऍक्ट सारखे आर्थिक कायदे ज्यामध्ये "उत्पन्न" हा शब्द वापरला गेला आहे ते वगळता, इतर कोणत्याही कायद्यांकडे आमचे लक्ष वेधणेत आणलेले नाही आणि त्यामुळे, असे म्हणणे शक्य होणार नाही कि विधिमंडळीय पद्धती नुसार गम्भीर शब्द यांचा एक विशिष्ट अर्थ प्राप्त आहे. 'उत्पन्न'' या शब्दाचे अनेक न्यायालयाने रेफेरेंस प्रकरणांमध्ये जे अर्थ लावलेले त्यांचा संदर्भ देणेत आले . त्यामुळे विधिमंडळाची प्रथा म्हणजे दुसरे काहीही नसून आर्थिक कायद्यामध्ये वापरलेल्या "उत्पन्न " याचे जे न्यायिक अर्थ नमूद केले तेच आहेत . सदर संदर्भित केलेले जे दाखले दिलेले आहे त्याचे अवलोकन असे करता असे स्पष्ट होते कि सदर निकालामध्ये अंतर्भूत असलेले निर्णय हे त्या शब्दाचा अर्थ इनकम टॅक्स ऍक्ट संबंधित होते. त्यामुळे प्रिव्ही कौन्सिल चे सन्मानीय न्यायमूर्ती यांनी कमिशनर ऑफ इनकम टॅक्स विरुद्ध शॉ व्यालेस अँड कंपनी[१] या प्रकरणाच्या कारणमीमांसा मध्ये नमूद केलेले "उत्पन्न" या शब्दाचा अर्थ हा या कायद्यामध्ये असलेप्रमाणे लावलेला आहे. न्यायमूर्ती रोलाट यांनी Ryal विरुद्ध Hoare आणि Ryal विरुद्ध Honeyill (2), निकालपत्र मधील परिच्छेद जो विद्यमान मुख्य न्यायमूर्ती यांनी त्यांच्या निकालपत्रामध्ये नमूद केला आहे व व तो श्री कोलाह यांनी आधार घेतला आहे तो या कायद्यांमध्ये " नफा" व "फायदा" शी संदर्भित आहे ' . Californian Copper Syndicate (Limited and Reduced) विरुद्ध Harris (८'), मध्ये लॉर्ड जस्टीस कलर्क असा उल्लेख करतात कि एकाद्या वस्तूची विक्रीपोटी किंमत तिच्या असलेल्या किमती पेक्षा जास्त मिळाली असेल तर ती इनकम टॅक्स ऍक्ट १८४२ ची अनुसूची D च्या अनुषंगाने " नफा" यामध्ये मोडत नाही. सदर सुरक्षित उल्लेख हे स्वच्छपणे दर्शवितो कि ते उल्लेखित कथन हे इनकम टॅक्स

ॲक्ट मध्ये "उत्पन्न" व "नफा" या वापरले गेलेल्या शब्दांशी संबंधित आहे. सदर उल्लेखीत यांनी "उत्पन्न" या सामान्य इंग्लिश शब्दाचा नैसर्गिक अर्थ कमी केला आहे असे म्हणणेस उचित जागा राहतच नाही. या प्रकरणाचे सत्य असे आहे की, प्राप्तीकर कायदा उत्पन्न या शब्दाची सर्वसमावेशक व्याख्या स्विकारत असताना अशा कायद्याची योजना मात्र अशा विशिष्ट शीर्षकाखाली येते. उदा. १९१८ चा इंग्रजी कायद्याची अनुसुची ५ व आपले कलम ६ सह इतर तदनुशंगीक कलमामधील तरतुदी आली कायद्यात नमुद केलेप्रमाणे उद्भवते किंवा जमा होते किंवा प्राप्त होते किंवा असे मानले जाते की उद्भवते किंवा जमा होते किंवा प्राप्त होते या योजनेसंदर्भात उत्पन्न या शब्दाचा अर्थ निश्चित करणेसाठी न्यायालयांनी खूप मेहनत घेतली आहे. असे माननेस कोणतेही कारण नाही कि न्यायालयांनी ''उत्पन्न'' या शब्दाचा अर्थ काढणेसाठी जो अर्थ लावला आहे तो त्या शब्दाचा परिपुर्णरित्या अर्थ लावण्याच्या हेतुने लावला आहे. जर आम्ही असे निर्णीत केले, जसे आम्हाला करणेस सांगीतले आहे की इनकम टॅक्स कायद्यातील''उत्पन्न'' या शब्दाचा अर्थ न्यायालयानी कठोरपणे लावला आहे, तर तार्किकदृष्टया भविष्यामध्ये सदर शब्दांच्या अर्थाची व्याप्ती वाढविणेस, दुरूस्ती शिवाय अगर इतर प्रकारे मान्य होवू शकणार नाही. इतका भव्य व आश्यचर्यकारक निष्कर्ष क्वचितच काढला जाऊ अगर घेता येवू शकतो. आमचे असे समाधान झाले आहे की, श्री. कोलाह यांनी ज्या न्यायनिर्णयाचे सदंर्भ दिले आहेत ज्यांचा उल्लेख विद्यमान मुख्य न्यायमुर्ती यांनी त्यांच्या निकालपत्रात केलेला आहे, त्यांचे आम्ही वाचन करता असे निश्पन्न होत नाही कि त्यांनी ''उत्पन्न'' या सामान्य इंग्रजी शब्दाचा अर्थ सिमीत प्रमाणात लावलेला होता- वॅलेस ब्रदर्स अँड कंपनी विरुद्ध प्राप्तीकर आयुक्त (१) हि केस ''उत्पन्न'' या शब्दाचा अर्थ काढणे संदर्भात अजिबात नव्हती. सदर केसमध्ये वादातीत मुद्दा असा होता की मुंबई मध्ये व्यवसाय करत असलेला भागीदरी फर्म मध्ये भागीदार असलेल्या इंग्लिश कंपनीची व सदर भारतीय कंपनीचे परकीय

उत्पन्न जे त्यांचेपेक्षा जास्त होते, त्यापैकी कोणाला "रहिवासी", म्हणून कलम ४-अ खाली मानता येईल. त्या संदर्भात त्या केसमध्ये कायदेशीर अधिकाराची व्याप्ती व अर्थ निश्चित करताना युनायटेड किंग्डम च्या विधीमंडळाच्या प्रथेप्रमाणे त्त्यांचेकडून काय स्विकारले गेले असेते. सदर केसमध्ये हा वादग्रस्त मुददा हा नव्हता की, उत्पन्न या शब्दाच्या अर्थाची व्याप्ती ही त्या कायद्याप्रमाणे "परकीय उत्पन्न" या शब्दासंबंधी किती आहे. सदर केस, स्वच्छपणे हे सिध्द करत नाही की "उत्पन्न , या शब्दाला काही विशेष किंवा संकुचित अर्थ आहे. लॉर्ड अथॅवट यांनी त्यांचा Privy Council चा [वर नमुद केलेला] खटला - व्यालेस विरुद्ध कमिशनर ऑफ इनकम टॅक्स मधील निकालपत्रात उल्लेखलेली केस -क्रॉफ्ट विरूध्द डन्फी [२] यामध्ये सदर टिप्पणी लागू होते. कामाक्ष नारायण सिंग विरूध्द कमीषन ऑफ इन्कम टॅक्स [३] या निकालपत्रात लॉर्ड राईट यांनी खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे.

" हे खरे आहे की, उत्पन्न हा अवघड शब्द आहे व त्याची तंतोतंत प्रमाणात व्याख्या करणे बहुतांशी शक्य नाही. हा शब्दाचा अर्थ व्यापक आहे."

वरील निरीक्षण नोंदविलेनंतर सदर न्यायमुर्ती यांनी त्यांचे पुढे सर जॉर्ज लॉन्डस यांचे कमीशनर ऑफ इन्कम टॅक्स बंगाल विरूध्द शॉ वॅलेस अँड कंपनी[वर उल्लेखलेली] मध्ये दिलेल्या निकालपत्रातील निरीक्षणाचा संदर्भ दिला आहे, ज्यामध्ये या कायद्यामध्ये वापरलेल्या "उत्पन्न" या शब्दाचा अर्थ लावणेचा प्रयत्न केला गेला होता. त्यामुळे हे स्पष्ट आहे की ज्या केस लॉज चा संदर्भ देत श्री कोलाह यांनी ते सिध्द करण्यासठी आधार घेतला आहे त्या हे दर्शवित नाहीत की विधीमंडळाची प्रथे नुसार "उत्पन्न" या शब्दाचा गर्भितार्थ हा प्राप्तीकर कायदा या मध्ये केलेल्या अर्थापेक्षा वेगळा आहे.

आमच्या मते, एन्ट्री ५४ मध्ये नमुद "उत्पन्न" या शब्दाचा अर्थ इंग्लीश विधीमंडळाच्या प्रथेप्रमाणे लावावा, असे जे श्री कोलाह यांनी सांगीतल्या आहे त्या प्रमाणे लावणे हे चुकीचे ठरेल. इथे हे नमुद करणे गरजेचे आहे की, इंग्लीष इन्कम टॅक्स ऍक्ट १९४५ [८ व ९ जिओ . सी.३२, सेकशन ३७ व ३८] मध्ये "भांडवली नफा" हा "कर आकारणीचे उत्पन्न" म्हणून अंतर्भूत केला आहे.

[(१) (1932) L. R. 59 I. A. 206 at page 2r2.

(२) (1923) 8 T. C. 521 at page 525.

(३) (1904) 5 T. C. 159 at page 165.]

हे स्मरणामध्ये ठेवले पाहिजे की, आमच्यासमोर असलेला प्रश्न हा संविधान कायदामध्ये नमुद असलेल्या त्या शब्दाचा खरा अर्थ काय आहे याचेशी निगडीत आहे, ज्याचा अर्थ संकुचित व पांडीत्यपूर्ण अर्थाने लावणेचा नाही. मुख्य न्यायमुर्ती GWYER यांनी द सेंट्रल प्राविन्सेस अँड बेरार ऍक्ट १९३४ चा १४ वा [१] या रेफरन्स प्रकरणातील निकालपत्रात असे निरीक्षण नोंदविले आहे की इतर कायद्यांमधील शब्दांचे अर्थ लावणेसाठी जे नियम आहेत तेच नियम घटनात्मक कायद्यातील शब्दांचे अर्थ, परंतू काही आरक्षित विषय वगळता, लागू होतात. हेही लक्षात ठेवले पाहीजे की आमच्या समोर असलेला मुद्दा हा विधीमंडळाचे अधिकार असलेल्या मथळयाखालील एन्ट्री ५४ मधील शब्दाचा अर्थ लावणेचा आहे. मुख्य न्यायमूर्ती GWYER यांनी द उणीवाटेड प्रोव्हिन्सस विरुद्ध आतिका बेगम या मधील निकालपत्रात पान क्र. १३४ मध्ये असे लक्षात आणून दिले आहे की सदर यादीमधील आयटम हे संकूचित व सिमित स्वरूपात वाचले जावू नयेत, तसेच प्रत्येक शब्द हा सर्व अनुषंगिक व सहायकबाबींपर्यंत विस्तारीत व लागु झाला पाहीजे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की मुख्य न्यायमुर्ती छगला

यांनी यावर षिक्कामोर्तब केले आहे की, विधीमंडळास अधिकार प्रदान करत असलेल्या [राज्यघटनेतील यादीतील नोंदीचा अर्थ लावताना त्यातील शब्दांचे अर्थ त्यांच्या सामान्य अर्थानुसार लावावेत. सी.पी अँड बेरार ऍक्ट [उल्लेखीत केलेली] मध्ये झाले प्रमाणे दोन वेगवेगळया यादींमधील दोन विसंगत तरतुदींचा ताळमेळ लावणेसाठी जसा केला होता व स्टेट ऑफ बॉम्बे अँड अनदर विरुद्ध एफ.एन.बेलसारा [३] यामध्ये जसे त्या तरतुदींची व्याप्ती कुठपर्यंत वाढविता येवू शकते, त्याचप्रमाणे दोन यादीमधील शब्दांचे अर्थ लावणेसाठी व त्यामधील तरतुदीचा परिणाम कमी करणेसाठी विधी मंडळाचा प्रथेचा संदर्भ घेणे कदाचित मान्य होवू श कते. शब्दांचे अर्थ लावणेचा मुख्य नियम असा आहे की, "शब्द" हे त्यांच्या नेहमीच्या नैसर्गिक व व्याकरणात्मक दृश्टीने असलेल्या अर्थाने वाचले पाहिजेत, परंतु अट अशीही आहे की घटनात्मक कायदा, जो विधीमंडळाला अधिकार प्रदान करतो, त्या कायद्यामधील शब्दांचे अर्थ मुक्तपणे लावले पाहीजेत, जेणेकरून त्याचा त्यांच्या व्यापक अर्थावर परिणाम होईल.

तर मग "उत्पन्न" या शब्दाचा सामान्य, नैसर्गिक आणि व्याकरणात्मक अर्थ काय आहे? शब्दकोषाप्रमाणे ज्याचा अर्थ "जी वस्तू आत येते"[पहा ऑक्सफर्ड शब्दकोश खंड ५, पान १६२, स्ट्राउंड, खंड २, पाने १४-१६]. युनायटेड स्टेटस ऑफ अमेरीका आणि ऑस्ट्रेलीया, जे दोन्हीही इंग्रजी बोलणारे देश आहेत, जिथे "उत्पन्न" हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो, ज्यामध्ये "भांडवली नफा" हा सुध्दा अंतर्भूत आहे. यासाठी आयसनर वि मॅकोमबर[१], मर्चंट्स लोन अँड ट्रस्ट कं. विरूध्द स्मीएतुका[२] आणि युनायटेड स्टेटस विरूध्द स्टेवर्ट [३] व रिष विरूध्द फेडरल कमीषनर आर्फ टॅक्सेशन [४] यांचा संदर्भ ही घेवू शकतो. [(1) \1920) 252 U. S. 189; 64 L. Ed. 521.

(2) (1925) 255 U.S. 509; 65 L. Ed. 751. (3) (1940) 311 U.S. 60; 85 L. Fd. 40.

(4) (1942) 66 C. L. R. 1G8.,] या प्रत्येक खटल्यांमध्ये "उत्पन्न" या शब्दाचा नैसर्गिक अर्थ व्यापकरित्या लावला गेला आहे. सदर खल्यांच्या निकालपत्रांमध्ये त्या न्यायमुर्ती यांनी नोंदविलेल्या निरिक्षणांचा उल्लेख जो न्यायमुर्ती यांनी नोंदविलेल्या निरीक्षणंचा उल्लेख आहे, जो न्यायमुर्ती तेंडुलकर यांनी त्यांच्या निकालपत्रांमध्ये नोंदविला आहे, तो असे दर्शवितो की अमेरीकेत किंवा ऑस्ट्रेलीयाचे राष्ट्रकुलात "उत्पन्न" या शब्दाचा अर्थ हा विधीमंडळाच्या एखाद्या प्रथेप्रमाणे लावलेला नाही तर तो त्या शब्दाची सामान्य संकल्पना व अर्थ, हा "उत्पन्न" या सामान्य इंग्रजी शब्दाप्रमाणे लावला होता. त्याचा सामान्य अर्थ असा आहे की "कोणताही नफा अगर फायदा", जो प्रत्यक्ष स्परूपात प्राप्त होतो. याचा लॉर्ड राईट यांनी केलेल्या निरीक्षणाशी ज्याचा उल्लेख या अगोदर केलेला आहे त्याच्याशी सुसंगत आहे. श्री कोलाह हे मान्य करतात की "उत्पन्न" हा शब्दाचा अर्थ हा विद्वान महाधिवक्त्यांनी युक्तीवादात सांगीतलेप्रमणे, युनायटेड स्टेटस व ऑस्ट्रेलिया मध्ये व्यापक अर्थाने समजला जातो, परंतु ते ठामपणे असेही विदीत करतात की, इंग्लंड मधील कायदा वेगळा आहे आणि त्यामुळे संसदीय कायद्यामध्ये एन्ट्री५४ जी आहे, तिचा इंग्लंडच्या कायद्याप्रमाणे अर्थ समजला जावा. आम्हाला पुन्हा पुर्वीच्याच युक्तीवादाकडे नेणेत येवून असे सांगणेत आले कि सदर शब्दाचा अर्थ इंग्लंडमधील विधीमंडळाच्या कार्यपध्दतीनुसार सिमीत प्रभावाने आहे, परंतु सदर युतीवाद आम्ही यापूर्वीच दुर्लक्षित केला आहे. जो युक्तीवाद विधीमंडळाच्या पध्दतीवर आधारलेला आहे तो स्वीकारनेच्या कक्षेबाहेर आहे, ज्यामुळे "उत्पन्न" या सामान्य इंग्रजी शब्दाला नैसर्गिक व व्याकरणात्मक अर्थ लावणेस कोणतीही अडचण येत नाही. याअगोदर नोंदविलेल्या निरीक्षणाप्रमाणे विधीमंडळास अधिकार प्रदान करनाऱ्या विधीमंडळाचे मथल्याखाली येत असलेल्या शब्दांचा अर्थ व्यापकरित्या लावला पाहीजे.

वर नमुद कारणास्तव आम्ही या मतास आलो आहे की १९४७ चा २२ वा कायदा, ज्याने प्राप्तीकर कायद्यात दुरूस्ती करत त्यामधील कलम २[६सी] मधील ''उत्पन्न'' या संज्ञेची व्याप्ती वाढवली व कलम६ मध्ये ''उत्पन्न'' हा 'नवीन मथळा' अंतर्भूत केला व कलम १२- ब नवीन अंतर्भुत केले, ते केंद्रीय विधानमंडळास असलेले अधिकारात आहेत , जे गव्हमेंट ऑफ इंडीया ऍक्ट १९३५ ची अनुसुची- ७, यादी -१ मधील एन्ट्री-५४ मध्ये असून ते त्याच्या अधिकारकक्षेत येत आहे. यामुळे सदर यादी मधील एन्ट्री ५५ चा अर्थ, व्याप्ती व परिकक्षा विचारात घेणे अगर त्याबाबत आमचे मत प्रदर्षित करणे अनावश्यक आहे. अपिल खर्चासह नामंजुर करणेत आले.

अपिल नामंजुर

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x